**शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यानंतर कब्जेहक्काच्या किंमतीवर आकारावयाचा व्याजाचा दर तसेच भाडेपट्ट्याने द्यावयाच्या जमिनीच्या वार्षिक भाडेपट्ट्याच्या दर घोषित करणेबाबत .**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक :- पीएलआर-२०१६/प्र.क्र.२६/ज-१**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
**दिनांक:- ०३ ऑगस्ट, २०२०.**

**<u>वाचा</u> :-** १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एलएनडी १०९२/प्र.क्र.८४/ज-१, दिनांक ३०.६.१९९२
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. जमीन १०९७/२२१४/प्र.क्र.९३/ज-१, दिनांक ८.७.१९९९

**<u>प्रस्तावना :-</u>**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता - १९६६ आणि महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम- १९७१ मधील तरतूदीनुसार शासकिय जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यानंतर, अशा जमिनींच्या कब्जेहक्काच्या रकमेवर त्या जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यापासून ते अंतिम कब्जेहक्काची किंमत निश्चित करुन तिचा भरणा करण्याच्या दिनांकापर्यंत १५ % दराने व्याज आकारण्याची. तसेच, शासकीय जमिनीच्या भूईभाड्याचा दर संपूर्ण बाजारमुल्याच्या १५ % आकारण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णय दि. ३०.६.१९९२ अन्वये तरतुद करण्यात आली होती. या दराबाबत शासनाकडून पुनर्विचार करुन व्याजाच्या व भूईभाड्याच्या उक्त दरामध्ये सुधारणा करुन संदर्भाधीन शासन निर्णय दि. ८.०७.१९९९ अन्वये सुधारित आदेश देऊन, त्यानुसार पुढील तरतुद करण्यात आली:-

*"आगाऊ ताबा दिलेल्या शासकिय जमिनीच्या अंतिम किंमतीवर तथा तात्पुरती किंमत व अंतिम किंमत यातील थकीत रकमेवर आकारावयाच्या व्याजाचा दर आणि भूईभाड्याने दिलेल्या शासकीय जमिनीच्या वार्षिक भूईभाड्याचा दर भारतीय स्टेट बँकेच्या "प्राईम लेंडींग रेट" इतका असावा. हा दर दरवर्षी दि. ०१ जानेवारीच्या भारतीय स्टेट बँकेच्या "प्राईम लेंडींग रेट" च्या दराइतका असावा आणि तो त्या संपूर्ण वर्षाकरिता कायम असावा. भारतीय स्टेट बँकेचा "प्राईम लेंडींग रेट" मध्येच बदलला, तरी पूर्वीचाच दर त्या संपूर्ण वर्षाकरिता कायम असेल व वर्ष संपल्यानंतर आवश्यक असल्यास पुन्हा सुधारण्यात यावा."*

त्यानुसार भारतीय स्टेट बँकेचा त्या-त्या वर्षी ०१ जानेवारी रोजी असलेला P.L.R. (Prime Lending Rate) घोषित करुन क्षेत्रीय यंत्रणांना कळविण्यात येतो. परंतु आता भारतीय रिझर्व बँकेच्या सुधारीत निर्देशानुसार **P.L.R. ऐवजी M.C.L.R.** (Marginal Cost of Funds based Lending Rate ही संज्ञा (term) वापरण्यात येत आहे. त्यानुसार दिनांक ०१.०१.२०२० रोजीचा भारतीय स्टेट बँकेचा संपूर्ण वर्षासाठीचा **M.C.L.R.** दर ७.९% घोषित केला आहे. त्यामुळे आगाऊ ताबा दिलेल्या शासकिय जमिनीच्या अंतिम किंमतीवर तथा तात्पुरती किंमत व अंतिम किंमत यातील थकीत रकमेवर आकारावयाच्या व्याजाचा दर आणि भूईभाड्याने दिलेल्या शासकीय जमिनीच्या वार्षिक भूईभाड्याचा दर सन २०२० या संपूर्ण वर्षासाठी घोषीत करुन तो क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.



Scanned with OKEN Scanner

## शासन परिपत्रक :-

शासकिय जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यानंतर, अशा जमिनींच्या कब्जेहक्काच्या रकमेवर, त्या जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यापासून ते अंतिम कब्जेहक्काची किंमत निश्चित करुन तिचा भरणा करण्याच्या दिनांकापर्यंत आकारावयाचा व्याजाचा दर तसेच, भाडेपट्टयाने देण्यात येणाऱ्या शासकीय जमिनीबाबत भूईभाडयासाठी आकारण्यात येणारा दर  सन २०२० या संपूर्ण वर्षासाठी ७.९% असा आकारण्यात यावा.

सदर शासन परिपत्रक वित्त विभागाने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १२९/२०२०/व्यय-९ दिनांक ०९.०७.२०२० अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसुरुन निर्गमित करण्यात येत आहेत.

२. सदर शासन परिपत्रक, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२००८०३१६३९०४५३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( रमेश चव्हाण )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहाय्यक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व विभागीय आयुक्त.
६. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (१) मुंबई.
९. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (२) नागपूर.
१०. सर्व जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी.
११. वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई.
१२.सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई.
१३. सर्व सहसचिव / उपसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१४. “ज” समुहातील सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई-०५.
१५. कक्ष अधिकारी (ल-१), संगणक शाखा, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-०५.
१६. निवडनस्ती कार्यासन ज-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.



Scanned with OKEN Scanner